श्री.किरण कुरुंदकर, अतिकालिक सेवानिवृत्त भा.प्र.से यांची करार पध्दतीने सचिव, राज्य निवडणूक आयोग म्हणून नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन शुध्दीपत्रक क्रमांक : बैठक-२०१८/प्र.क्र.८७/कार्या.३७

हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १६.०४.२०१९.

वाचा: शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बैठक-२०१८/प्र.क्र.८७/कार्या.३७, दिनांक.१७.१२.२०१८

शासन शुध्दीपत्रक:-

शासनाने राज्य निवडणूक आयोगाशी सल्ला मसलत करून श्री. किरण कुरुंदकर, अतिकालिक वेतनश्रेणीतील सेवानिवृत्त भाप्रसे यांची "सचिव, राज्य निवडणूक आयोग" या पदावर त्यांनी कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने नियुक्त केल्याचा शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१८ रोजी निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयातील परि.३ (iii) मधील (अ) वगळण्यात येत आहे.

२. तसेच सदर शासन निर्णयातील परि.३ (iii) (अ) पुढीलप्रमाणे वाचावा:-

(अ) नियुक्तीच्या कालावधीत श्री. कुरुंदकर यांना त्यांच्या सेवानिवृत्तीच्यावेळी महागाई भत्त्यासह देय असलेल्या वेतनातून त्यांचे निवृत्ती वेतन वजा करून उर्वरित रकमेइतके मासिक पारिश्रमिक अनुज्ञेय राहील. श्री. कुरुंदकर यांना निवडणुकीच्या कामाकरिता कराव्या लागणाऱ्या प्रवासाकरिता सचिव पदास अनुज्ञेय असलेला प्रवासभत्ता व दैनिक भत्ता लागू राहील. तसेच या पदास अनुज्ञेय असलेला दूरध्वनी भत्ता, वर्तमानपत्र, निवासी शिपाई भत्ता, इत्यादी अनुषंगिक भत्ते मिळण्यास ते पात्र असतील.

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०४१६१३१२२६३७०७ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Suresh Rajendrarao Kalasker

Digitally signed by Suresh Rajendrarao Kalasker
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2cc5d502d2808166f14439713ecfd22090ad056c72dd4986514fabb71611cd2a, serialNumber=a5e0019100c80215d07c5f70e49582040ad4295b497a3f5f7c9e697418dcea2d, cn=Suresh Rajendrarao Kalasker
Date: 2019.04.16 13:19:04 +05'30'

(सुरेश कळसकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक.
२. मा.मुख्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

३. मा.मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
४. मा.अपर मुख्य सचिव,(सेवा), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
५. मा.अपर मुख्य सचिव,(वित्त विभाग), यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६. मा.प्रधान सचिव तथा मु.रा.अ.यांचे स्वीय सहाय्यक,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
७. मा.सचिव, आयुक्त,राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, मुंबई
८. श्री.किरण कुरुंदकर, सचिव (नव नियुक्त), राज्य निवडणूक आयोग,मुंबई
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई
१०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
११.निवासी व लेखा अधिकारी, मुंबई
१२.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३.कक्ष अधिकारी,कार्या-३७ व कक्ष अधिकारी, कार्या-१३, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१४.निवडनस्ती (कार्या-३७).